# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 19.09.2026** **वार : शनिवार**

---

## ठळक बातम्या

1. पंतप्रधानांच्या हस्ते आज रोजगार मेळाव्यात 51 हजारांहून अधिक नियुक्तीपत्रांचं वितरण.
2. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते 38 व्या पुणे महोत्सवाचं उद्घाटन.
3. घाऊक ग्राहकांसाठी सध्या लागू असलेली साखरेची 15 दिवसांची साठवणूक मर्यादा 30 दिवसांपर्यंत वाढणार.
4. ऑस्कर पुरस्कारासाठी भारताकडून 'गोंधळ' या मराठी चित्रपटाची निवड.
5. विसाव्या आशियाई क्रीडा स्पर्धांना आजपासून जपानमध्ये सुरुवात.

## सविस्तर बातम्या

**रोजगार मेळावा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज 20 व्या रोजगार मेळाव्यात दुरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून विविध सरकारी विभाग आणि संस्थामध्ये नव्यानं नियुक्त झालेल्या तरुणांना 51 हजारांहून अधिक नियुक्तीपत्रे प्रदान करणार आहेत. याप्रसंगी ते उपस्थितांना संबोधितही करतील. हा रोजगार मेळावा देशभरात 45 ठिकाणी आयोजित करण्यात येणार आहे. या रोजगार मेळाव्यामुळं विविध विभाग आणि सरकारी संस्थांमध्ये नियुक्ती पत्रे मिळणाऱ्या तरुणांची एकंदर संख्या 12 लाख 75 हजारांवर पोहोचणार आहे.

**उपराष्ट्रपती**

आधुनिक विकास साधताना देशाचा सांस्कृतिक वारसा, परंपरा आणि मूल्यांचं जतन करणं आवश्यक आहे, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी काल पुण्यात केलं. ३८व्या पुणे महोत्सवाचं उद्घाटन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते काल पुण्यात झालं त्यावेळी ते बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या योगदानाचं उपराष्ट्रपतींनी स्मरण केलं. यावेळी बोलताना उपराष्ट्रपती म्हणाले...

**We may have modern outlook, but at the core of our heart, we must respect our values and the traditions. We must build modern cities while protecting their cultural soul. We must encourage innovation while respecting the tradition. We must ensure that development reaches every sections of the society, while our heritage continues to inspire future generations. Pune is an inspiring example of how a city can advance across diverse sectors while preserving its heritage and tradition values.**

या कार्यक्रमात, भारतीय चित्रपटसृष्टी आणि कलाक्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांना उपराष्ट्रपतींच्या हस्ते 'संस्थापक सुरेश कलमाडी पुणे फेस्टिव्हल जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमाला  राज्यपाल जिष्णू देव वर्मा, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, खासदार हेमा मालिनी, खासदार मेधा कुलकर्णी यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

कालच्या आपल्या एक दिवसीय दौऱ्यात उपराष्ट्रपतींनी मुंबईत लालबागचा राजा गणेशोत्सव मंडळाच्या गणरायाचं  आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या बाप्पाचंही दर्शन घेतलं.

लोणावळ्यातील कैवल्यधामच्या गोरधनदास सेक्सारिया कॉलेज ऑफ योग अँड कल्चरल सिंथेसिसच्या अमृतमहोत्सवी कार्यक्रमाला देखील उपराष्ट्रपती उपस्थित राहिले.

**विमान हस्तांतरण**

हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडने काल बेंगळुरू येथे झालेल्या कार्यक्रमात, भारतीय वायु सेनेला दोन 'एलसीए तेजस' 'एफओसी' श्रेणीतील दोन आसनी प्रशिक्षक विमाने आणि तीन, 'एचटीटी-40' मूलभूत प्रशिक्षक विमाने, तसंच पवन हंस लिमिटेडला 4 'ध्रुव' नेक्स्ट जनरेशन हेलिकॉप्टर्स सुपूर्द केली. या कार्यक्रमाला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि नागरी हवाई वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू उपस्थित होते. अंतराळ क्षेत्रात आत्मनिर्भरता ही काळाची गरज असून, या क्षेत्रात धोरणात्मक प्रगती केली गेली पाहिजे असं प्रतिपादन राजनाथ सिंह यांनी यावेळी बोलताना केलं.

**साखर-मर्यादा**

सरकारनं, घाऊक ग्राहकांसाठी सध्या लागू असलेली साखरेची 15 दिवसांची साठवणूक मर्यादा 30 दिवसांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, 15 दिवसांच्या सध्याच्या मर्यादेपेक्षा अधिक ठेवला जाणारा साखरेचा साठा केवळ ॲडव्हान्स ऑथरायझेशन स्कीम म्हणजेच अग्रिम अधिकार योजना आणि टॅरिफ रेट कोटा म्हणजेच, शुल्क दर कोटा अंतर्गत आयात केलेल्या साखरेतूनच प्राप्त केलेला असावा, अशी अट घालण्यात आली आहे. खुल्या बाजारातून खरेदी करण्यात येणाऱ्या साखरेच्या साठवणुकीची मर्यादा मात्र पूर्वीप्रमाणेच राहणार असून, ती केवळ 15 दिवसांच्या वापरापुरती मर्यादित असेल. सध्या जे घाऊक ग्राहक प्रती महिना 10 मेट्रिक टन पेक्षा अधिक साखर वापरतात त्यांना साखरेचा साठा, 15 दिवसांपर्यंत ठेवण्याची परवानगी आहे.

**पाकिस्तान-स्फोट**

पाकिस्तानमधील खैबर पख्तुनख्वा प्रांतातील कोहाट जिल्ह्यात काल एका मशिदीजवळ झालेल्या स्फोटात 15 पोलिसांसह 21 जण ठार झाले आणि 100 हून अधिक जण जखमी झाले. या घटनेत किमान 73 पोलीस आणि 30 नागरिक जखमी झाल्याचं कोहाट रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. ताहिर शाह यांनी सांगितलं. शुक्रवारच्या नमाजदरम्यान हा स्फोट झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. आतापर्यंत 6 दहशतवादी मारले गेल्याचं पोलिस सूत्रांनी सांगितलं असून 'इत्तेहाद-उल-मुजाहिदीन पाकिस्तान' या दहशतवादी संघटनेनं हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. राष्ट्राध्यक्ष आसिफ अली झरदारी आणि पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी या घटनेचा निषेध केला आहे.

**तृणमूल काँग्रेस-चिन्हं**

निवडणूक आयोगाकडून तृणमूल काँग्रेस पक्षाच्या दोन्ही गटांना काल स्वतंत्र नावं आणि निवडणूक चिन्हं देण्यात आली. अरूप रॉय गटाला 'डेमोक्रॅटिक तृणमूल काँग्रेस' हे नाव आणि Envelope अर्थात 'लिफाफा' हे चिन्ह तर ममता बॅनर्जी गटाला 'ममता ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस' हे नाव आणि 'फुटबॉल खेळाडू' हे चिन्ह देण्यात आलं आहे. पश्चिम बंगाल, मेघालय आणि त्रिपुरामध्ये या दोन्ही गटांना मान्यताप्राप्त राजकीय पक्ष म्हणून दर्जा दिला जाईल, असं निवडणूक आयोगानं आपल्या आदेशात म्हटलं आहे. पुढील महिन्याच्या 6 तारखेला नंदीग्राम आणि रेजीनगर इथं होणाऱ्या पोटनिवडणुका दोन्ही गट नवीन नावं आणि चिन्हांसह लढवतील.

**रेल्वे**

महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातल्या चौक-कर्जत दुपदरीकरण तसंच मुकुटबन-गडचांदूर या नव्या रेल्वेमार्गासाठी एकंदर 990 कोटी रुपये खर्चाला रेल्वे मंत्रालयानं मंजुरी दिली आहे. त्याचप्रमाणे, यवतमाळ जिल्ह्यातल्या मुकुटबन आणि चंद्रपूर जिल्ह्यातल्या गडचांदूर या औद्योगिक आणि खनिज क्षेत्रांना जोडणाऱ्या 38 किलोमीटरपेक्षा जास्त लांबीच्या रेल्वेमार्गासाठी 493 कोटी रुपयेही रेल्वेनं मंजूर केले आहेत.

**रक्षा खडसे**

केंद्रीय युवक व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या अध्यक्षतेखाली काल देशभरातल्या 93 विद्यापीठांच्या कुलगुरूंची उच्चस्तरीय बैठक झाली. युवक व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाच्या युवक-केंद्रीत प्रमुख उपक्रमांमध्ये उच्च शिक्षण संस्थांचा सहभाग अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने ही बैठक घेण्यात आली. या बैठकीत, सहभागी विद्यापीठ प्रमुखांना, विकसित भारत युवा नेतृत्व संवाद 2027, नशामुक्त अभियान आणि युवा संपर्क कार्यक्रम या उपक्रमांची माहिती देण्यात आली, तसंच, या उपक्रमांमध्ये तरुण पिढीचा सक्रिय सहभाग कसा वाढवता येईल, यावर चर्चा करण्यात आली.

**व्यावसायिक-वातावरण-सर्वेक्षण**

भारतातील स्वीडिश चेंबर ऑफ कॉमर्सनं केलेल्या 'व्यावसायिक वातावरण सर्वेक्षण 2026' मध्ये, चाळीसहून अधिक जागतिक बाजारपेठांच्या यादीत भारताला प्रथम क्रमांकाची पसंती मिळाली आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी समाज माध्यमावरील एका संदेशाद्वारे ही माहिती दिली. जागतिक अस्थिरतेच्या काळात स्थिरता, विकास आणि व्यवसाय सुलभता याबाबतीत भारतामधील व्यावसायिक वातावरण सुवर्ण मानक प्रस्थापित करत असल्याचं ते म्हणाले.

**<u>सॉफ्टवेअर सेवा निर्यात</u>**

देशाच्या सॉफ्टवेअर सेवा निर्यातीत 2025-26 या आर्थिक वर्षात, 8 पूर्णांक 2 दशांश टक्क्यांनी वाढ होऊन ती सुमारे 221 अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या संगणक सॉफ्टवेअर आणि आयटी क्षेत्रातल्या निर्यातीच्या वार्षिक सर्वेक्षणानुसार काल ही आकडेवारी जाहीर करण्यात आली.

**<u>ऑस्कर-गोंधळचित्रपट</u>**

प्रतिष्ठेच्या ऑस्कर पुरस्काराच्या स्पर्धेसाठी भारताकडून संतोष डावखर लिखित आणि दिग्दर्शित 'गोंधळ' या मराठी चित्रपटाची निवड झाली आहे. 33 चित्रपटांमधून या चित्रपटाची निवड झाल्याचं निवड समितीचे अध्यक्ष पी. शेषाद्री यांनी सांगितलं. 'श्वास', 'हरिश्चंद्राची फॅक्टरी' आणि 'कोर्ट' नंतर ऑस्करसाठी भारताकडून पाठवलेला 'गोंधळ' हा चौथा मराठी चित्रपट आहे. यंदाचा 99वा ऑस्कर सोहळा 14 मार्च 2027 रोजी होणार आहे.

**<u>आशियाई स्पर्धा</u>**

20 व्या आशियाई क्रीडा स्पर्धा 2026ला आजपासून प्रारंभ होतं आहे. जपानमधील आयची-नागोया येथील पालोमा मिझुहो स्टेडियममध्ये भारतीय प्रमाण वेळेनुसार आज दुपारी अडीच वाजता स्पर्धेचा उद्घाटन समारंभ सुरू होईल. ऑलिम्पिक पदक विजेती मनू भाकर आणि गोळाफेक पटू तजिंदरपाल सिंग तूर हे उद्घाटन सोहळ्यात भारताचे ध्वजवाहक असतील. 4 ऑक्टोबर पर्यन्त चालणाऱ्या या स्पर्धेत, 500 हून अधिक भारतीय खेळाडू 37 खेळांमध्ये भाग घेणार आहेत.

**<u>हवामान</u>**

भारतीय हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार आज बिहार, पूर्व राजस्थान, गुजरात, लक्षद्विप, ओडिशा आणि सिक्कीम मध्ये मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर, अंदमान आणि निकोबर बेटे, केरळम, तामिळनाडू आणि पुद्दुचेरीमध्ये मेघगर्जना आणि वीजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.